# संपादकीय

## हरियाणात केजरीवाल फॅक्टर चालेल ?

सध्या राजकीय वर्तुळात हरियाणा विधानसभा निवडणुकीची २०२४ ची चर्चा आहे. वास्तविक, स्पर्धा राज्यातील प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेस आणि सत्ताधारी पक्ष भाजप यांच्यात आहे. मात्र जननायक जनता पक्ष म्हणजेच जेजेपी, इंडियन नॅशनल लोकदल पार्टी म्हणजेच आयएनएलडी आणि आम आदमी पार्टी म्हणजेच आप या पक्षांशिवाय अपक्ष उमेदवारांबाबतही चर्चेचा बाजार तापला आहे. काँग्रेस आणि भाजपमधील कोणत्याही पक्षाला बहुमत मिळाले नाही, तर अशा स्थितीत या निवडणुकीत या पक्षांची भूमिका महत्त्वाची ठरेल, अशी अटकळ बांधली जात आहे.दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना जामीन मंजूर केला आहे. या वर्षी मार्चमध्ये ईडीने दिल्ली दारू धोरण प्रकरणी केजरीवाल यांना अटक केली होती. यानंतर सीबीआयने सीएम केजरीवाल यांनाही जूनमध्ये अटक केली होती. या अटकेविरोधात केजरीवाल यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. केजरीवाल यांना शुक्रवारी जामीन मिळाला. २०१९च्या हरियाणा विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाने ४६ जागांवर निवडणूक लढवली होती. पण पक्षाची कामगिरी निराशाजनक राहिली आणि एकही जागा जिंकता आली नाही.नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत पक्षाला ३.९४ टक्के मते मिळाली होती.यावेळी अरविंद केजरीवाल यांच्या पत्नी राज्यात प्रचार करताना दिसल्या आणि ती केजरीवाल यांची ओळख हरियाणातून आल्याचा वारंवार उल्लेख करताना दिसली.या निवडणुकीत स्वबळावर चांगली कामगिरी करण्याची पक्षाला आशा आहे. हरियाणामध्ये आम आदमी पक्षाची फारशी ताकद नाही. आणि यावेळी काँग्रेससोबत युतीच्या वाटाघाटीबाबत चर्चा सुरू असताना, आम आदमी पार्टीने स्वतः दहा जागा मागितल्या होत्या. आणि काँग्रेसने त्यांना फक्त पाच जागा देऊ केल्या होत्या. हे वृत्त प्रसारमाध्यमांमध्येही आले होते. पक्षाने उमेदवार दिले असले तरी ९० जागांवर रिंगणात उतरण्याएवढी क्षमता आपची नक्कीच नाही. तरीही अरविंद केजरीवाल यांना जामीन मिळाल्यामूळे ते हरियाणाच्या निवडणूक प्रचारात नक्कीच भाग घेतील. केजरीवाल बनिया समाजाचे असल्यामुळे आपला वैश्य मते मिळण्याची शक्यता असल्याचं बोललं जातय. विशेषत: केजरीवाल तरुण आणि शेतकऱ्यांना जोडण्याविषयी बोलतात. कदाचित यावेळीही ते असेच करतील. यावेळी आम आदमी पक्षानेही काँग्रेस आणि भाजपच्या असंतुष्ट नेत्यांना तिकीट दिले आहे, त्यामुळे तेही प्रभाव दाखवण्याची शक्यता असल्याचं हरियाणातील राजकीय तज्ज्ञांचं मत आहे. असे जरी असले तरी आम आदमी पार्टी हा इंडियन नॅशनल लोकदल आणि जननायक जनता पक्षापेक्षा हरियाणात छोटा पक्ष आहे. अरविंद केजरीवाल यांचा केवळ दिल्लीतच नाही तर हरियाणामध्येही प्रभाव आहे, असे अनेकांचे मत आहे. अशा स्थितीत हरियाणात प्रचारासाठी गेल्यास ते भाजपविरोधात आपली मते मांडण्यात यशस्वी होऊ शकतात. विशेषत: हिंदी पट्ट्यात राहुल गांधींनंतर अरविंद केजरीवाल यांचीच चर्चा होते. याचे कारण अरविंद केजरीवाल हे सतत चर्चेत असतात. ते जनतेच्या हिताचेच बोलतात, हे जनतेपर्यंत पोहोचवण्यात ते यशस्वी झाले आहेत. मात्र त्यांना तसे करण्यापासून रोखले जात आहे. अशा स्थितीत अरविंद केजरीवाल यांच्या लोकप्रियतेचा आलेख खाली येईल, असे दरवेळी दिसते. पण, यावेळीही केजरीवाल तुरुंगातून बाहेर आल्यानंतर त्यांच्या लोकप्रियतेचा आलेख चढण्याची शक्यता आहे. दुसरीकडे असेही म्हटले जात आहे की, केजरीवाल यांनी प्रचार केल्यानंतर दिल्ली आणि पंजाबच्या निवडणुकीच्या निकालांमध्ये मोठा बदल दिसला नाही. पक्षाच्या व्हिजननुसार त्यांच्या प्रचाराला हरियाणात नक्कीच गती मिळेल. कारण, ते पक्षाचे स्टार प्रचारक आहेत. असं असलं तरी हरियाणात आम आदमी पक्षाचा पाया तितका मोठा नाही. अशा स्थितीत केजरीवाल यांच्या उपस्थितीचा निवडणूक निकालांवर फारसा परिणाम होणार नाही असेही म्हटले जात आहे. हरियाणात २०२४ च्या लोकसभा निवडणुका काँग्रेस आणि आम आदमी पक्षाने एकत्रितपणे लढवल्या होत्या. मात्र, 'आप'ने कुरुक्षेत्राच्या एका जागेवरच निवडणूक लढवली.या जागेवरून आपचे प्रदेशाध्यक्ष सुशील गुप्ता निवडणूक रिंगणात होते. यावेळी आम आदमी पार्टी एकट्याने निवडणूक लढवत आहे.आम आदमी पार्टी आणि काँग्रेस युती झाली नसल्यामुळे भाजपचे कमी नुकसान होईल पण काँग्रेसचे जास्त नुकसान होईल असे अनेकांना वाटते. पण, आम आदमी पक्षाचा जनाधार एवढा मोठा नाही की तो काँग्रेसच्या विजयात मोठा फरक करू शकेल. त्यामुळेच दीपेंद्र हुडा, रणदीप सुरजेवाला या काँग्रेसच्या बड्या नेत्यांनी या आघाडीला विरोध केला. युती झाली नाही तरी केजरीवाल यांच्या सुटकेचा फायदा काँग्रेसला होईल, असेही राजकीय तज्ज्ञांचे मत आहे. इंडिया आघाडीचे मित्रपक्ष काँग्रेस आणि आम आदमी पार्टी हरियाणात स्वतंत्रपणे लढत असले तरी अरविंद केजरीवाल यांच्या सुटकेचा काँग्रेसलाही फायदा होईल. आम आदमी पक्षाचे उमेदवार सर्वत्र आव्हान देण्याच्या स्थितीत नाहीत. आम आदमी पक्षाच्या एवढ्या उमेदवारांना तिकीट देण्याचा प्रश्न आहे, तर त्यांनाही त्यांचा राष्ट्रीय स्तरावरचा दर्जा कायम ठेवावा लागेल . हरियाणा विधानसभेत एकूण ९० जागा आहेत.२०१४ आणि २०१९ च्या विधानसभा निवडणुका जिंकून भाजप गेली १० वर्षे सत्तेत आहे. २०१९ च्या हरियाणा विधानसभा निवडणुकीत भाजपने ४० जागा जिंकल्या आणि काँग्रेसने ३१ जागा जिंकल्या. दुष्यंत चौटाला यांच्या पक्ष जेजेपीसोबत युती केल्यामुळे भाजपला सरकार स्थापन करण्यात यश आले. यावेळी जेजेपी आणि भाजपचे मार्ग वेगळे झाले आहेत. पण चंद्रशेखर आझाद यांचा आझाद समाज पक्ष (कांशीराम) आणि जेजेपी यांच्यात युती झाली आहे. यावेळी, २०२४च्या विधानसभा निवडणुकीत हरियाणामध्ये ५ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे आणि ८ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे.


**काँग्रेस आणि भाजपमधील कोणत्याही पक्षाला बहुमत मिळाले नाही, तर अशा स्थितीत या निवडणुकीत या पक्षांची भूमिका महत्त्वाची ठरेल, अशी अटकळ बांधली जात आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना जामीन मंजूर केला आहे. या वर्षी मार्चमध्ये ईडीने दिल्ली दारू धोरण प्रकरणी केजरीवाल यांना अटक केली होती. यानंतर सीबीआयने सीएम केजरीवाल यांनाही जूनमध्ये अटक केली होती. या अटकेविरोधात केजरीवाल यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. केजरीवाल यांना शुक्रवारी जामीन मिळाला. २०१९च्या हरियाणा विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाने ४६ जागांवर निवडणूक लढवली होती. पण पक्षाची कामगिरी निराशाजनक राहिली आणि एकही जागा जिंकता आली नाही.**

## संतवाणी



**चित्त ग्वाही तेथें लौकिकाचे काई ।**
**स्वहित तें ठायीं आपणापें ।।१।।**
**मनासी विचार तोचि साच भाव ।**
**व्यापक हा देव अंतर्बाहीं ।।ध्रु.।।**
**शुद्ध भावा न लगे सुचावा परिहार ।**
**उमटे साचार आणिके ठायीं ।।२।।**
**भोगित्यासी काज अंतरीचें गोड ।**
**बाहिरल्या चाड नाहीं रंगें ।।३।।**
**तुका म्हणे भाव शुद्ध हें कारण ।**
**भाट नारायण होईल त्यांचा ।।४।।**

देवाची भक्ती करणे विषय आपले चित्त जर आपल्याला साक्षी असेल तर इतरांच्या साक्षी काय गरज आहे आपल्या सहित आपल्याजवळच आहे. आत बाहेर सर्व ठिकाणी देव व्यापून आहे, असा विचार मनात सतत असणे हाच खरा भाव. आपल्या ठिकाणचा शुद्ध भाव दुसऱ्याला सांगण्याचे कारणच नाही. तो आपोआपच लोकांना समजून येत असतो.जो परमानंद रस भोगत आहे. आपल्या अंतरंगात रममाण आहे त्याला बाहेरील रंगाची चाडच नसते.तुकाराम महाराज म्हणतात ज्यामध्ये शुद्ध भाव आहे, त्याचा स्तुती करणारा भाटच नारायण होईल.



## गांधी विचार

**सर्वशक्तिमान ईश्वराने सर्वात कमी प्रतीच्या प्राण्यालाही चुका करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. असे असताना काही लोक, मग ते कितीही अनुभवी वा पात्र असले तरी, इतरांचा तो बहुमूल्य अधिकार काढून घेऊन कसे आनंदी होऊ शकतात ते मला कळत नाही. ज्याप्रमाणे प्रत्येक देशात खाण्यापिण्याचे व श्वासोच्छवास करण्याचे सामर्थ्य असते त्याचप्रमाणे प्रत्येक राष्ट्रात आपल्या समस्या, त्या कितीही क्लिष्ट असल्या तरी, सोडवण्याचे सामर्थ्य असते. वरून लादलेली बंधने केव्हाही वाईट असतात. जेव्हा हे बंधन निघून जाईल तेव्हा राष्ट्र मुक्तपणे श्वास घेऊ शकेल, त्याला चुका करण्याचा अधिकार असेल. चुका करून त्या दुरुस्त करत जाण्याची प्राचीन पद्धती हाच प्रगतीचा योग्य मार्ग आहे. माझे निश्चित मत आहे की, कोणताही माणूस आपल्या स्वतः च्या दुबळेपणाशिवाय अन्य कोणत्याही कारणाने आपले स्वातंत्र्य गमावत नाही.**

# स्वातंत्र्याचा दिव्य संदेश (१)

हळूहळू स्वातंत्र्य अशी कोणतीही गोष्ट नाही. स्वातंत्र्य तर जन्मासारखे असते. सर्व प्रकारचे जन्म एका क्षणातच होत असतात.स्वाभिमानी माणसाकरिता सोन्याच्या बेड्याही तितक्याच क्लेषकारक असतात जितक्या लोखंडाच्या. वेदना बंधनात असतात, धातूमध्ये नसतात. माझ्या मते सोन्याच्या बेड्या लोखंडी बेड्यांपेक्षा किती तरी जास्त वाईट असतात, कारण लोखंडाच्या बेड्यांचे क्लेषकारी स्वरूप माणसाच्या सहज लक्षात येते. उलट सोन्याच्या बेड्यांचे दुःख बहुधा विसरले जाते. यामुळे भारत जर बेड्यांमध्ये बंदिस्त राहणारच असेल. तर तो सोन्यासारख्या एखाद्या बहुमूल्य धातूच्या बंधनात असण्यापेक्षा लोखंडाच्या बेड्यात बंदिस्त असावा. ते स्वातंत्र्य खोटे आहे ज्यात चूक करण्याचेच नाही तर पाप करण्याचेही स्वातंत्र्य नसते. सर्वशक्तिमान ईश्वराने सर्वात कमी प्रतीच्या प्राण्यालाही चुका करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. असे असताना काही लोक, मग ते कितीही अनुभवी वा पात्र असले तरी, इतरांचा तो बहुमूल्य अधिकार काढून घेऊन कसे आनंदी होऊ शकतात ते मला कळत नाही. ज्याप्रमाणे प्रत्येक देशात खाण्यापिण्याचे व श्वासोच्छवास करण्याचे सामर्थ्य असते त्याचप्रमाणे प्रत्येक राष्ट्रात आपल्या समस्या, त्या कितीही क्लिष्ट असल्या तरी, सोडवण्याचे सामर्थ्य असते. वरून लादलेली बंधने केव्हाही वाईट असतात. जेव्हा हे बंधन निघून जाईल तेव्हा राष्ट्र मुक्तपणे श्वास घेऊ शकेल, त्याला चुका करण्याचा अधिकार असेल. चुका करून त्या दुरुस्त करत जाण्याची प्राचीन पद्धती हाच प्रगतीचा योग्य मार्ग आहे. माझे निश्चित मत आहे की कोणताही माणूस आपल्या स्वतः च्या दुबळेपणाशिवाय अन्य कोणत्याही कारणाने आपले स्वातंत्र्य गमावत नाही. व्यक्तिगत स्वातंत्र्य मूल्यवान आहे हे मला मान्य आहे. परंतु आपण हे विसरू नये की, माणूस हा मूलतः सामाजिक प्राणी आहे. समाजाच्या प्रगतीच्या गरजेप्रमाणे आपल्या व्यक्तिस्वातंत्र्याला मुरड घातल्यामुळे तो आजच्या स्थानावर पोहोचला आहे. निरंकुश व्यक्तिस्वातंत्र्य हा जंगली पशूचा नियम आहे. व्यक्तिस्वातंत्र्य आणि सामाजिक संयम यातील मध्यमार्ग आपल्याला शोधावा लागेल. संपूर्ण समाजाच्या कल्याणाकरिता स्वेच्छापूर्वक सामाजिक संयम स्वीकारल्यामुळे व्यक्ती आणि समाज, ज्या समाजाची ती व्यक्ती सदस्य आहे. या दोघांचेही कल्याण होते. जर व्यक्तिस्वातंत्र्य गेले तर असे समजा की सर्व काही गेले. व्यक्तीचेच महत्त्व राहिले नाही तर समाजात शिल्लक तरी काय राहील? व्यक्तिस्वातंत्र्यच माणसाला स्वेच्छापूर्वक सामाजिक सेवेकरिता पूर्णपणे समर्पित करायला लावते. माणसाला बळजबरीने समर्पण करायला लावले तर तो यंत्रमानवाप्रमाणे काम करील व परिणामी समाजाची हानी होईल. माणसाला व्यक्तिस्वातंत्र्यापासून वंचित करून कोणत्याही समाजाची घडण होऊ शकत नाही. ही गोष्ट पूर्णपणे मानवी स्वभावाच्या विरोधी आहे. ज्याप्रमाणे माणसाला शेपूट आणि शिंगे फुटू शकत नाहीत त्याचप्रमाणे त्याला स्वतःचे मन नसले तर त्याचे अस्तित्व राहणार नाही. खरे म्हणजे ज्या लोकांचा व्यक्तिस्वातंत्र्यावर विश्वास नसतो त्यांचा स्वतःच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर मात्र विश्वास असतो. परंतु चंगेजखानच्या आधुनिक आवृत्त्या स्वतः चे स्वातंत्र्य निरंकुश ठेवत असतातस्वातंत्र्याची माझी संकल्पना काही संकुचित संकल्पना नाही. तिच्यात माणसाच्या संपूर्ण प्रतिष्ठेसह त्याच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा समावेश आहे. प्रत्येक व्यक्तीला आपल्या प्रतिभेचा उपयोग करण्याचे पुरेपूर स्वातंत्र्य असले पाहिजे, त्याचबरोबर त्याच्या शेजाऱ्यांनाही आपल्या प्रतिभेचा उपयोग करण्याचे तसेच स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, परंतु कोणत्याही व्यक्तीला आपल्या प्रतिभेमुळे होणाऱ्या लाभाचा हवा तसा उपयोग करण्याचे स्वातंत्र्य असू शकत नाही. व्यक्ती, राष्ट्राचा वा असे म्हणा की आजूबाजूच्या सामाजिक संरचनेचा भाग आहे. यामुळेच व्यक्ती आपल्या प्रतिभेचा उपयोग केवळ स्वतः करिता करू शकत नाही. उलटपक्षी तिने आपल्या प्रतिभेचा उपयोग त्या सामाजिक संरचनेच्या कल्याणार्थ केला पाहिजे जिचा ती भाग आहे व जिच्या मौन संमतीने ती हे जीवन जगत असते.कोणताही अत्याचारी आपल्या शिकारीच्या सहकार्याशिवाय आपल्या उद्दिष्टात यशस्वी होऊ शकलेला नाही. हे मात्र खरे की त्याने हे सहकार्य बळजबरी करून मिळवलेले असते. बहुतेक माणसे प्रतिकाराच्या परिणामाची फळे भोगण्यापेक्षा अत्याचारी माणसाच्या इच्छेला शरण जाणे पसंत करतात. याचमुळे दहशत हे अत्याचाऱ्याचे महत्त्वाचे शस्त्र असते. परंतु दडपशाहीचा आधार घेऊनही शिकारीवर आपली इच्छा लादण्यात अत्याचारी माणसाला यश आले नाही अशी उदाहरणे इतिहासात आहेत.अतिशय जुलमी सरकारसुद्धा आपल्या शासितांच्या सहकार्याशिवाय चालू शकत नाही. हे खरे आहे की, जुलमी सरकार ही संमती बहुधा बळजबरीने मिळवते. परंतु प्रजेच्या मनातून निरंकुश सत्तेची भीती निघून जाऊ लागली की निरंकुश सत्ता निष्प्रभ होते.यापुढे गुलामगिरी करायची नाही असा निर्धार ज्या क्षणी गुलाम करतो त्या क्षणापासूनच गुलामगिरीच्या त्याच्या बेड्या निखळून पडतात. तो स्वतंत्र होतो व इतरांनाही स्वातंत्र्याचा मार्ग दाखवतो. स्वातंत्र्य आणि गुलामी या मानसिक अवस्था आहेत. यामुळे, 'आता मी गुलामगिरी करणार नाही. मी आदेशांचे जसेच्या तसे पालन करणार नाही. जे आदेश माझ्या अंतःकरणाला स्वीकारार्ह वाटत नाहीत त्या आदेशांचे मी पालन करणार नाही' असे म्हणण्याची पहिली गरज असते. आपण एक असो की अनेक, आपल्या स्वाभिमानाचे वा आपण जोपासलेल्या आपल्या श्रद्धांचे मोल देऊन त्यांच्या मोबदल्यात आपले स्वातंत्र्य विकत घेण्याला आपण नकार दिला पाहिजे. लहान मुलांना एखादी गोष्ट करायची असेल वा हवी असेल परंतु आईवडिलांनी त्यांना त्याकरिता परवानगी दिली नाही तर – मग आईवडिलांच्या दृष्टीने ती गोष्ट कितीही तुच्छ असो – आईवडिलांसमोर हट्टाने ताठ उभे राहताना मी त्या मुलांना पाहिले आहे. आपण जर स्वतंत्र स्त्री–पुरुष म्हणून जगू शकणार नसू तर मरण पत्करण्यात आपल्याला समाधान वाटले पाहिजे. आपल्या पारतंत्र्याकरिता माणसाने स्वतःलाच दोष दिला पाहिजे. ज्या क्षणी तो निर्धार करील त्याच क्षणी तो स्वतंत्र होईल. स्वातंत्र्याकरिता कोणतीही किंमत मोठी नाही. स्वातंत्र्य जीवनाचा श्वास आहे. माणूस जिवंत राहण्याकरिता काय देणार नाही ? स्वतंत्र भारतातील काही लोक आपल्या भविष्याविषयी चिंताग्रस्त असलेले जेव्हा मी पाहतो तेव्हा

मला पीडा आणि आश्चर्य या दोन्ही गोष्टींचा अनुभव येतो. माझ्या मते भारत जोपर्यंत आपल्या सीमांमधील, केवळ कृत्रिम नाही तर नैसर्गिक, अगदी तळाशी असलेल्या व्यक्तींना स्वातंत्र्याची ग्वाही देत नाही तोपर्यंत त्याला स्वतंत्र भारत म्हणता येणार नाही. आमची भीती आमच्या विचारशक्तीला अवरुद्ध करते. असे नसते तर प्रत्येक प्रामाणिक स्त्री– पुरुषाकरिता सध्याच्या परिस्थितीपेक्षा स्वातंत्र्याची परिस्थिती केव्हाही चांगली हे आम्हाला लगेच कळले असते. स्वातंत्र्याच्या आगमनाने केवळ त्यांनीच घाबरले पाहिजे जे शोषक आहेत, इतरांचा पैसा लुबाडणारे आहेत, डाकू आहेत वा अशाच प्रकारचे इतर अपराधी आहेत. मी अशा घटनेकरिता प्रयत्न करीन की ज्यात गुलामगिरी वा संरक्षणवादाला कोणत्याही प्रकारचा आश्रय मिळणार नाही आणि याकरिता गरज पडली तर मी पाप करण्याचाही अधिकार देईन. मी अशा भारताकरता प्रयत्न करीन ज्यात गरिबात गरीब माणसालाही हा देश आपला आहे आणि याच्या निर्मितीत आपला महत्त्वाचा वाटा आहे असे वाटेल; एक असा भारत की जिथे लोकांमध्ये ना कोणी उच्च असेल आणि ना कोणी कमी प्रतीचा; एक असा भारत ज्यात सर्व समुदायांमध्ये मैत्रीभाव असेल. अशा भारतात अस्पृश्यतेच्या अभिशापाला वा मादक द्रव्यांना कोणतेही स्थान नसेल, स्त्रियांनाही पुरुषांच्या बरोबरीचे अधिकार असतील. उर्वरित जगाशी आपले शांततापूर्ण संबंध असल्यामुळे... ना आपण कोणाचे शोषण करू ना कोणाला आपले शोषण करू देऊ ..... यामुळे आपल्याला कमीत कमी सैन्य ठेवावे लागेल. भारताच्या करोडो मूक जनतेच्या हक्कांच्या विरोधात नसलेल्या सर्व देशी आणि विदेशी हितसंबंधांना मान्यता देण्यात येईल. व्यक्तिगत दृष्टीने सांगायचे तर देशी आणि विदेशी असा भेद मला घृणास्पद वाटतो. माझ्या स्वप्नातील भारत हाच आहे, मला दुसरा कोणताही भारत नको.

## जडणघडण भारताची

**अनेक धर्म, शेकडो जाती, अनेक भाषा, वेगेवेगळी संस्कृती असूनही इतका मोठा देश प्रचंड उलथापालथ होऊनही अखंड राहणं ही प्रत्येक भारतीयासाठी थक्क करणारी आणि तितकीच अभिमानाची गोष्ट आहे. राजकारण, अर्थकारण, समाजकारण, विज्ञान, साहित्य, कला, क्रीडा अशा विविध क्षेत्रात भारतवासीयांनी दिलेले असामान्य योगदान हा देश घडवण्यात महत्त्वाचे आहे. म्हणूनच या देशाच्या जडणघडणीचा मागोवा घेणं आम्हाला महत्त्वाचं वाटतं. दैनिक हेराल्ड भारताच्या जडणघडणीतल्या महत्त्वाच्या घटना आणि माहिती वाचकांसाठी घेऊन येत आहे.**

# गृहमंत्री मुफ्ती महमंद सईद यांच्या कन्येचे अपहरण (१९८९)

नोव्हेंबर १९८९ मध्ये विश्वनाथ प्रताप सिंह यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय आघाडीचं नवनिर्वाचित सरकार सत्तारूढ झाल्यावर अल्पावधीतच म्हणजे ९ डिसेंबर, १९८९ रोजी नवे गृहमंत्री मुफ्ती महमंद सईद यांची कन्या रुबिया सईद यांचं जेकेएलएफच्या हस्तकांनी दिवसाढवळ्या अपहरण केलं. त्यांच्या मुक्तीसाठी दहशतवाद्यांच्या ५ कैद्यांची सुटका करण्याची नामुष्की केंद्र सरकारवर ओढवली. १९८९च्या नोव्हेंबर महिन्यात देशात झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये सत्तापालट होऊन विश्वनाथ प्रताप सिंह यांच्या नेतृत्वाखाली जनता दलाचं सरकारसत्तारूढ झालं. विश्वनाथ प्रताप सिंग यांच्या मंत्रिमंडळात मुफ्ती महंमद सईद गृहमंत्री नात्याने काम पाहत होते. २ डिसेंबर, १९८९ रोजी नव्या सरकारने कार्यभार स्वीकारल्यानंतर सातच दिवसांनी रुबिया सईद यांचं अपहरण झालं. डॉ. रुबिया ही श्रीनगरमधील एका रुग्णालयात प्रशिक्षणार्थी डॉक्टर म्हणून काम करत होती. ९ डिसेंबर, १९८९ रोजी ती मिनी बसमधून घरी परतत असताना बंडखोरांनी ती बस अडवून तिला जबरदस्तीने खाली उतरवलं आणि एका जीपमधून अज्ञात स्थळी नेलं. देशाच्या गृहमंत्र्यांच्या कन्येचं अपहरण झाल्याने संपूर्ण देश हादरला. रुबियाच्या सुटकेच्या मोबदल्यात काश्मीरमधील तुरुंगात असलेल्या जम्मू–काश्मीर लिबरेशन फ्रंटच्या (जेकेएलएफच्या) बंडखोर नेत्यांच्या सुटकेची मागणी अपहरणकर्त्यांनी केली. अब्दुल हमीद शेख, जावेद अहमद झरगर, अल्ताफ अहमद बट्ट, नूर महंमद कलवाल आणि शेर महमद खान या पाच कडव्या बंडखोरांच्या सुटकेबद्दल ते जास्त आग्रही होते. हे अपहरण नाट्य घडलं, तेव्हा मुफ्ती महंमद सईद दिल्लीत होते. तर काश्मीरचे मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला वैद्यकीय तपासणीसाठी अमेरिकेत गेलेले होते. ते तडकाफडकी भारतात परतले.

पंतप्रधानांनी लगेचच त्यांच्याशी व त्याचप्रमाणे राष्ट्रपती, मंत्रिमंडळातील सहकारी आणि अन्य पक्षांच्या महत्त्वाच्या नेत्यांबरोबर चर्चा केली. केंद्र आणि राज्य सरकारच्या प्रतिनिधींनी अपहरणकर्त्यांबरोबर पडद्याआडून वाटाघाटी सुरू केल्या. अपहरणकर्ते सतत आपल्या मागण्या बदलत होते. जम्मू–काश्मीरचे मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला अपहरणकर्त्यांच्या मागण्या मान्य करण्यास तयार नव्हते. परंतु, केंद्र सरकारने बंडखोरांच्या सुटकेची मागणी मान्य करून अपहरणानंतर ४ दिवसांनी म्हणजे, १३ डिसेंबर रोजी त्यांची सुटका केली. त्यानंतर दोन तासांनी अपहरणकर्त्यांनी रुबियाला मुक्त केलं. सुटका झालेल्या बंडखोरांच्या स्वागतासाठी जमलेल्या मोठ्या जमावाने या बंडखोरांची श्रीनगरमध्ये मिरवणूक काढली. त्यानंतर ते भूमिगत झाले. डॉ. रुबिया सईद अपहरण प्रकरणात केंद्र आणि राज्य सरकारच्या हतबलतेचं दर्शन घडलं. सरकारची सपशेल शरणागती हा बंडखोरांनी मोठा विजय मानला. यानंतरच्या काळात जम्मू आणि काश्मीरमध्ये दहशतवादाचा जोर वाढला. अपहरणांच्या घटनांमध्ये वाढ झाली. उदाहरणार्थ, या घटनेनंतर नजीकच्या काळातच बीबीसीच्या एका वार्ताहराचं अपहरण, एका वरिष्ठ अधिकाऱ्याचं अपहरण, आणखी एका महत्त्वाच्या राजकीय नेत्याच्या कन्येचं अपहरण अशा घटना घडल्या. रुबिया अपहरण नाट्यानंतर फुटीरतावादी गटांची संख्या वाढत गेली. त्यामध्ये जेकेएलएफ आणि हिज्ब–उल–मुजाहिदीन हे दोन गट प्रमुख ठरले. याशिवाय लष्कर–ऐ–तैयबसारख्या पाकिस्तान– धार्जिण्या दहशतवादी संघटनांच्या कारवायाही वाढल्या. नव्वदच्या दशकात फोफावलेल्या दहशतवादामुळे काश्मीरची आणि पर्यायाने देशाचीही होरपळ झाली.

## विज्ञान कथा

# नवा विक्रम : १९ मानव करतायत पृथ्वी प्रदक्षिणा

इंटरनॅशनल स्पेस स्टेशनवर आणखी तीन लोकांच्या आगमनाने, पृथ्वीची कक्षा आता पूर्वीपेक्षा जास्त व्यस्त आहे. बुधवारच्या स्पेस एक्सच्या प्रक्षेपणानंतर आता अंतराळात १९ मानव आहेत. मानवतेसाठी हा एक नवीन विक्रम आहे असे नासाने म्हटले आहे. या आठवड्याच्या सुरुवातीला, तीन जणांनी रशियन सोयुझ कॅप्सूलमधून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाच्या दिशेने प्रवास केला. यामध्ये नासाचे अंतराळवीर डॉन पेटिट तसेच रॉसकॉसमॉस कॉस्मोनॉट लेक्सी ओव्हचिनिन आणि इव्हान वॅग्नर यांचा समावेश होता. यासह आता पृथ्वीभोवती १९ मानव प्रदक्षिणा करत आहेत.हा एक नवा विक्रम आहे. कक्षेत यापूर्वीचा विक्रम मे २०२३ मध्ये स्थापित करण्यात आला होता. त्यावेळेस, आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक तसेच चीनचे तिआंगॉन्ग अंतराळ स्थानक या दोन्ही ठिकाणी थोड्या काळासाठी एकूण १७ लोक होते. प्रत्येक वेळी किमान एक व्यक्ती कक्षेत असताना, आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक २००० पासून कायमस्वरूपी उपस्थितीचे साक्षीदार आहे. पेटिट, ओव्हचिनिन आणि व्हॅग्नर यांच्या आगमनानंतर, आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर इतर नऊ अंतराळवीर आणि अंतराळवीर सामील झाले आहेत. यामध्ये सुनीता विल्यम्स, बॅरी विल्मोर, मायकेल बॅरेट, ट्रेसी कॅल्डवेल–डायसन, मॅथ्यू डॉमिनिक आणि नासाचे जीनेट एप्स आणि अंतराळवीर निकोलाई चब, ओलेग कोनोनेन्को आणि अलेक्झांडर ग्रेबेन्किन यांचा समावेश आहे. तिआंगॉन्ग स्पेस स्टेशनवर बसलेले तीन लोक म्हणजे शेनझोऊ १८ मिशनचे ली गुआंगसू, ली काँग आणि ये गुआंगफू. त्यांच्याशिवाय, चार अंतराळवीर आहेत, जे सध्या मुक्त–उड्डाण करणाऱ्या क्रू ड्रॅगनमध्ये राहत आहेत. यामध्ये जेरेड इसाकमन, स्कॉट पोटेट, सारा गिलिस आणि ना मेनन यांचा समावेश आहे.मंगळवारी प्रक्षेपित केलेले, पोलारिस डॉन मिशन पाच दिवस चालेल अशी अपेक्षा आहे.भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बॅरी विल्मोर यांना या वर्षी जूनमध्ये ऑनबोर्ड क्रू फ्लाइट टेस्ट लाँच करण्यात आले, जे बोईंगच्या स्टारलाइनर कॅप्सूलचे पहिले क्रू मिशन होते.जरी हे अभियान काही दिवस चालणार होते, तरी कॅप्सूलला कक्षामध्ये थ्रस्टर समस्या आल्याने नासाने स्टारलाइनरला आयएसएस वर डॉक ठेवण्याचा निर्णय घेतला.सरतेशेवटी, स्टारलाइनर विरहित पृथ्वीवर परतला, तर विल्यम्स आणि विल्मोर आता फेब्रुवारी २०२५ मध्ये स्पेसएक्स क्रू ड्रॅगन कॅप्सूलवर पृथ्वीवर परतण्याची अपेक्षा आहे.

## प्रतिसाद

### कृत्रिम हौदांत विसर्जित केलेल्या मुर्त्या जातात कुठे ?

श्रीगणेश चतुर्थीला प्राणप्रतिष्ठा करून घरी बसवण्यात येणाऱ्या श्रीगणेशमूर्तीचे पुढे दीड, पाच, सात किंवा दहा दिवस मनोभावे पूजन करून विसर्जन केले जाते. भक्ताच्या भावामुळे श्री गणेशाची पवित्रके त्या मूर्तीमध्ये मोठ्या प्रमाणात आलेली असतात ही पवित्रके सर्वदूर पसरून त्याचा अधिकाधिक लोकांना लाभ व्हावा, यासाठी श्रीगणेश मूर्तीचे वाहत्या पाण्यात किंवा नैसर्गिक स्रोतांत विसर्जन करावे, असा शास्त्रसंकेत आहे. यामुळेच ग्रामीण भागांमध्ये फार पूर्वीपासून गावातील वाहत्या नदीमध्ये श्री गणेशमूर्तींचे विसर्जन केले जाते. शहरी भागांत किंवा तालुक्यासारख्या ठिकाणी वाहते पाणी उपलब्ध नसल्याने प्रशासनाकडून गेल्या काही वर्षांत कृत्रिम तलावांचा किंवा हौदांचा पर्याय उपलब्ध करून दिला जात आहे. विसर्जित केलेल्या मुर्त्यांची माती किंवा अवशेष नंतर कृत्रिम तलावांतून काढून पुढे समुद्रात किंवा नद्यांमध्ये विसर्जित केले जाईल, असे काही ठिकाणी सांगितले जाते. तर बऱ्याच ठिकाणी या विसर्जित केलेल्या मूर्तींचे पुढे काय केले जाते, याविषयी भक्तगण अनभिज्ञच असतात. भक्तांनी दान केलेल्या आणि कृत्रिम तलावांत विसर्जित केलेल्या मूर्ती काही ठिकाणी खाणी बुजवण्यासाठी आणि विटा बनवण्यासाठी वापरण्यात आल्याचे मध्यंतरी उघड झाले होते. घरी मनोभावे पूजन केलेल्या गणेशमूर्तींचा पुढे अशा प्रकारे वापर केला जाणे गणेशभक्तांसाठी अत्यंत वेदनादायी आहे. त्यामुळे गणेशभक्तांच्या श्रद्धेचा मान ठेवून प्रत्येक कृत्रिम तलावांत आणि हौदांत विसर्जित केलेल्या मूर्तींच्या अवशेषांचे आणि मातीचे प्रशासनाने पुढे काय केले हे गणेशभक्तांना पुराव्यासह दाखवून द्यावे.

**–जगन घाणेकर,**
घाटकोपर, मुंबई

**संपादकीय विभागाचा पत्ता :** दैनिक हेराल्ड, हेराल्ड इमारत, मुख्य टपाल कार्यालयाच्या मागे, सां टॉमे, पणजी गोवा, ४०३००१. **दूरध्वनी:** ०८३२–६७१८५१९ , **मडगाव:** ०८३२–२७१००१०, **फोंडा:** २३१६५१०, **मुंबई:** ०२२–२२८४०७०२, २२८४४९०८.

**ईमेल:** बातम्या अथवा पत्रके पाठवण्यासाठी news@dainikherald.com, क्रीडा बातम्यांसाठी sports@dainikherald.com, लेख पाठवण्यासाठी features@dainikherald.com, वाचकांच्या पत्रांसाठी editor@dainikherald.com, आणि जाहिरातींसाठी advt@herald-goa.com.

**सूचना:** संपादकीय वगळता दैनिक हेराल्डमध्ये प्रसिद्ध झालेल्या लेखांतील आणि पत्रांतील मते संबंधित लेखकाची असून दैनिक हेराल्डचे संपादक, प्रकाशक आणि/अथवा मालक यांचा त्या मतांशी काहीही संबंध नाही. दैनिक हेराल्डमधील जाहिराती या जाहिरातदाराने दिलेल्या माहितीवर आधारित असतात. जाहिरातीतील मजकुराची वैधता दैनिक हेराल्ड तपासून पाहू शकत नाही. जाहिरातीतून उद्भवणाऱ्या कोणत्याही विषयाला जबाबदार दैनिक हेराल्ड नसून जाहिरातदारच आहे.